मुंबई तरुण भारत
www.mahamtb.com



मुंबई, शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२०



सुरत-[illegible] महामार्गावरील पिंपळनेर-ताहाराबाद रस्त्यावर जायखेडा पोलिसांकडून मध्यरात्रीच्या सुमारास 'चहापाणी'च्या नावाखाली वसुली चालू असून, ही वसुली नक्की कोणाच्या कृपाशीर्वादाने चालू आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पिंपळनेर-ताहाराबाद रस्त्यावर असलेल्या कातरवेल तपासणी नाक्यावर कागदपत्र तपासणीच्या नावाखाली गुजरात व इतर ठिकाणांहून येणाऱ्या वाहनधारकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. महामार्गावरून धावणाऱ्या प्रवासी व अवजड वाहतूक करणाऱ्या प्रवासी व अवजड वाहतूक करणाऱ्या वाहनांना थांबवायचे, कागदपत्रांच्या नावाखाली चालकाची अडवणूक करायची आणि काही चिरीमिरी घेत वाहन सोडून द्यायचे. यात काही वाहनधारकांना काही चूक नसतानासुद्धा 'चहापाणी' द्यावे लागते, नबरचा माल बिनधास्त नेत असावेत, अशी शंका उपस्थित केली जात आहे. खाकी वर्दीतील हे वसुली कारकून नेमके कोणाच्या आशीर्वादाने 'चहापाणी' जमा करतात, अशी सर्वत्र चर्चा रंगली आहे. काही दिवसांपूर्वी जायखेडा पोलीस ठाणे हद्दीतील नामपूर येथे एका गुटखाविक्रेत्यावर कारवाई केल्याची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये समोरील व्यापारी हप्ता देत नसल्याच्या कारणावरून त्याच्यावर कारवांई करण्यात आली. या कारवाईत मोठी रक्कम मागण्यात आल्याचे व तडजोड करून मिटविल्याचे निदर्शनास येत आहे. नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. प्रतापराव दिघावकर हे जायखेडा पोलीस हद्दीतील निताणे येथील भूमिपुत्र आहेत. ज्या अधिकाऱ्यांच्या किंवा कुणाच्याही कृपाशीर्वादाने ही वसुली सुरू असेल त्यांच्यावर विशेष पोलीस महानिरीक्षक चाप लावतील का, याकडे आता तालुक्याचे लक्ष लागले आहे. मागील काही दिवसांपूर्वी येवला तालुक्यात अवैध धंदे सुरू असल्याबाबत एका कुटुंबाने पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांच्याकडे तक्रार केली व त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक यांच्याकडून चौकशी झाल्यानंतर पोलीस अधीक्षक यांनी सर्व अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनेप्रमाणे तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचारी यांच्यावर कारवाई केली. परंतु, जायखेडा पोलीस ठाणे हद्दीत बिनधास्तपणे सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर पोलीस विशेष महानिरीक्षक यांच्या पथकाने कारवाई केली. परंतु, तेथील स्थानिक अधिकाऱ्यांवर कुठलीच कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

[illegible]
अधीक्षक, नाशिक

# कांदा साठवणूक मर्यादा वाढवून द्यावी : खा. भारती पवार

**मनमाड, दि. २९ (प्रतिनिधी):** "व्यापाऱ्यांना घालून दिलेली कांदा साठवणुकीची मर्यादा वाढवून द्यावी," अशी मागणी दिंडोरी लोकसभा मतदारसंघाच्या खा. डॉ. भारती पवार यांनी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांना पत्र पाठवून केली आहे. कांद्याच्या साठवणूक मर्यादेमुळे व्यापाऱ्यांनी जिल्ह्यातील जवळपास सर्वच बाजारपेठात कांदा लिलाव करणे थांबविले आहे. शेतकऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांवरील संकटातून मार्ग काढण्यासाठी खा. डॉ. भारती पवार यांनी केंद्राकडे ही मागणी केली आहे.

खा. डॉ. भारती पवार यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून "केंद्र सरकार सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी असून त्यांची परवड होऊ देणार नाही. लवकरच व्यापारीवर्गाशी चर्चा करून सुवर्णमध्य काढू," असे आश्वासन केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी खा. डॉ. भारती पवार यांना दिले.

**ASIAN FOOD PRODUCTS LIMITED**
**Regd Off:** 37/39, 3rd Floor, Kantol Niwas, Modi Street, Fort,Mumbai-400 001.
**Admin Off:** 7 Thakkers, Near Nehru Garden, Nashik- 422 001.
CIN: L99999MH1968PLC013919
**Telephone Nos. 022 32450425**
E-mail: info@asianfoodproduct.in Website: www.asianfoodproduct.in

**NOTICE**

NOTICE is hereby given pursuant to Regulation 47 read with Regulation 29 (1) (a) of the 'Securities And Exchange Board of India (Listing Obligations And Disclosure Requirements) Regulations 2015', that the meeting of Board of Directors of the company will be held on Wednesday, November 04,2020 at administrative office to inter alia consider and take on record Unaudited Financial Results for the Quarter Ended 30th September, 2020.

The trading window will remain close for all insiders of the company from 02nd November, 2020 to 05th November 2020 and would re-open on 06th November 2020.

The information is also available on the website of the Company at www.asianfoodproduct.in and on the website of the Stock Exchange at www.bseindia.com

By order of the Board
For ASIAN FOOD PRODUCTS LIMITED
sd/-
(CHETAN G.BATAVIA)
Chairman

Nashik
**28/10/2020**